संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ४३०/२०१७

**निशाणी क्र. ७**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी**

Deposition of Witness No. for the

*मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,*

I do hereby on solemn affirmation state that--

**माझे नाव : दिपक नारायण निंबाळकर,**

My name Father's name

**वय सुमारे : ४९ वर्षे व्यवसाय : रोजमजुरी,**

Age about Years Occupation

**निवासस्थान : डांगे ले आउट, ब्राम्हणी, कळमेश्वर, जि. नागपूर.**

Residence District

---------------

**सरतपास अभियोग पक्षातर्फे श्री. एस. जी. इंगळे सरकारी अभियोक्ता**

१. दिनांक ०२.०६.२०१७ रोजी, पोलीसांनी मला सुचनापत्र देवून पंचनाम्याकरीता बोलाविले होते. त्यांनी मला पी. डबलु. एस. कॉलेजजवळ ईस्माईल ले आउट मध्ये बोलाविले होते. तेथे मी व माझा मित्र निळकंठ असे होतो. रात्री दहाचे सुमारास आम्हाला पोलीसांनी बोलाविले होते. घटनास्थळी बंजरंगबलीची मुर्ती तोंडावर होती. तिचे तोंड फुटले होते. तसेच, देवाजवळची अगरबत्ती व पुजेचे साहित्य ईकडे तिकडे पडलेले दिसले. तसेच, तेथे एक ठाकरसिंग महाराजाचा फोटो होता. तो देखील अस्ताव्यस्त पडलेला दिसला. घटनास्थळाचे दक्षिणेकडे व पुर्वकडे तसेच उत्तरेकडे रोड आहे. पश्चिमेकडे सोनटक्के यांचे मकान आहे. रात्री दहा ते बारा पर्यंत ही कारवाई चालली. पोलीसांनी कारवाई नंतर कागदावर लिखापढी केली होती ती आम्हास वाचण्यास सांगितली व ती आम्ही वाचून त्यावर सही केली.

२. सुचनापत्र दाखविले तर ओळखू शकतो. मला आता सुचनापत्र दाखविले, त्यावर माझी सही असुन, मजकुर खरा व बरोबर आहे. सुचनापत्रास **नि.८** देण्यात येते.

३. घटनास्थळ पंचनामा दाखविला तर ओळखू शकतो. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावर माझी आणि दुस—या पंचाची सही असुन, मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि.९** देण्यात येते.

**उलटतपास बचाव पक्षातर्फे ॲड. श्री. एन. डी. अंजनकर**

DISTRICT COURT NAGPUR

४.        घटनास्थळी जेव्हा घटनास्थळ पंचनामा झाला तेव्हा त्या ठिकाणाला कोणतेही गेट किंवा संरक्षणात्मक भिंत नव्हती. देउळ हे उघडेच होते. देवासाठी पुजेचे वेळी आम्ही नैवद्य म्हणजेच पेढा, साखर ठेवतो. हे म्हणणे खरे आहे की, देउळ उघडे असल्याने तेथे मोकाट डुकरे, कुत्रे व माकडे येत असतात. हे म्हणणे खरे नाही की, देउळ उघडे असल्याने मोकाट कुत्र्यांनी किंवा माकाडाने देवाची मुर्ती व फोटो पाडले असावे. हे म्हणणे खरे नाही की, ईस्माईलने देउळासाठी वेगळी जागा दिली होती.

५.        मी या देउळामध्ये नेहमी पुजेला जातो. तसेच, मी डांगे ले आउट येथे राहत आहे. हे देउळ परवानगीने बसविले आहे की असेच बसविले आहे हे मला माहीती नाही. माझे घरापासुन शंभर फुटावर हे देउळ आहे. देउळ हे माझे नेहमीचे नजरेखालचे असल्याने मला देउळाच्या चतुर्सिमा माहीती आहे. घटनास्थळ पंचनाम्यावर सही करण्यास मी स्वत: ईच्छुक असल्याने मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की, ईतर लोकांनी कोर्ट कचेरीचे काम आहे म्हणुन पंचनाम्यावर सही करण्यास नकार दिला होता.

६.        हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा हा पोलीस ठाण्यात तयार केला होता. घटनेचे दिवशी ईस्माईल ले आउटमध्ये देउळात मिटींग ठेवली होती किंवा नाही हे मला माहीती नाही. घटना जेव्हा घडली तेव्हा लोक आपआपल्या घरी होते.

७.        हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळवरील मुर्ती दुस—या ठिकाणी स्थापीत करण्याबाबत आमचे लोकांमध्ये ठरले हाते. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबतची मिटींग देखील आमचे लोकांत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

८.        उलटतपास संपला.

९.        फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरीत/—

**(व्ही. बी. कांबळे )**

दिनांक : १६.०५.२०१९.        न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळमेश्वर.

DISTRICT COURT NAGPUR